प्रेस नोट
आयुक्तालय अमरावती शहर
गुन्हे शाखा युनिट क्रं. ०१ कडबी बाजार
मसांनगज अमरावती
mebranch.cpamp@mahapolice.gov.in
Office No. 0721-2550181

# गुन्हे शाखा युनिट क्रं.1 अमरावती शहर यांचेकडून आंतरराज्यीय शिखलकरी टोळीचे सदस्य ताब्यात घेवून घरफोडी व मोटरसायकल चोरीचा गुन्हा उघड करुन अंदाजे १८ तोळे सोने किंमत अंदाजे १४,४०,०००/-रु. जप्त करण्यात आले.

दिनांक ०४/०२/२०२५ रोजी फिर्यादी नामे पंकज धनराज भंवरेकर, वय ३६ वर्षे, रा. कल्याणनगर, अमरावती यांनी पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे जबाणी रिपोर्ट दिला की, दिनांक ०३/०२/२०२५ रोजी त्यांचे जावाई व बहीन हे कुंभ मेळयाकरीता प्रयागराज येथे गेले असता त्यांचे राहाते घरी नमुना गल्ली क्रं.६, अमरावती येथे चोरी झाली असून कोणीतरी अज्ञात ईसमांनी माझे बहीनीचे घराचे कूलूप व कोंडा तोडून घरात प्रवेश करुन बेडरुममधील कपाट फोडून त्यामध्ये ठेवलेले नगदी १,००,०००/-रु. व व सोन्याचे दागीने असे एकूण १०,०८,०००/- रु. ची चोरी केली आहे. वरुन पो.स्टे. सिटी कोतवाली येथे अप.क्रं.३२/२०२४ कलम 305(अ), 331(२), 331(४) बी.एन.एस. प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा हा भेटीयुक्त असल्याने वरिष्ठ अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देवून गुन्हया संदर्भाने मार्गदर्शन करुन गुन्हा उघडकीस आणणे बाबत देशीत केले होते. गुन्हा घडल्यापासून गुन्हे शाखा युनिट क्रमांक -०१, अमरावती शहर हे गुन्हयाचा सातत्याने तपास करीत होते, तपास करीत असतांना जवळपास १०० ते १५० सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासून व तांत्रिक माहितीच्या आधारे सदर आरोपी हे मेहकर, जानेफळ या भागातील असल्याची गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाल्याने दोन दिवसांपासून गुन्हे शाखा युनिट क्रमांक -०१ चे अधिकारी व अंमलदार यांनी वेषांतर करुन जानेफळ पो.स्टे.हददीतील शेंदला या गावातून शिकलकरी वस्तीमधून स्थानिक पोलीसांच्या मदतीने **आरोपी नामे सतनाम सिंग प्रताप सिंग बावरी, वय ३३ वर्षे, रा. शेंदला, ता. मेहकर, जि. बुलढाणा** यांस ताब्यात घेण्यात आले व विश्वासात घेवून त्याचेकडे गुन्हयासंदर्भाने चौकशी केली असता त्याने सदर गुन्हा त्याचे इतर दोन साथीदार **क्र.२. मायासिंग कृपालसिंग सरदार, वय ३६, वर्षे, रा.वडनगर, जि. मेहसाना, राज्य- गुजरात व क्रं.३ सतपालसिंग गुरुबचनसिंग सरदार, वय २८ वर्षे, रा.वडनगर, जि. मेहसाना, राज्य- गुजरात** यांचेसह फोरव्हीलर टोयटा कंपनीची ब्लांझा, गाडी क्रमांक GJ/38 BF-8003 ने अमरावती येथे येवून चोरी केल्याची कबूली दिली. तसेच सदर चोरी करतांना पुन्हा एक मोटरसायकल चोरी केल्याची कबूली दिली, सदर बाबत पो.स्टे. राजापेठ येथे मोटर सायकल चोरीचा अपराध क्रमांक ५४/२०२५ कलम ३०३ (३) भा.न्या.स. प्रमाणे अभिलेखावर नोंद आहे.

सदर आरोपीतां बाबत माहिती घेतली असता आरोपी व आरोपीचे साथीदार यांचेवर महाराष्ट्र तसेच गुजरात राज्यात घरफोडी, दरोडा तसेच आर्म ॲक्टचे बरेचसे गुन्हे दाखल असून आरोपी हे आंतरराज्यीय शिखलकरी टोळीचे सदस्य आहेत. सदर गुन्हयात आरोपी यांचेकडून अंदाजे १८० ग्रॅम पिवळया धातूचे दागीने किंमत अंदाजे १४,४०,०००/-रु. जप्त करण्यात आले आहे. गुन्हयातील मुददेमाल दिल्याने कायदेशीर प्रक्रीया करुन खालील प्रमाणे मुददेमाल ताब्यात घेण्यात आला.

| मुद्द्रेमालाचे नाव | वनज अंदाजे | किंमत अंदाजे |
|---|---|---|
| १. ब्रासलेट - | वजन अंदाजे ३४.५३० ग्रॅम, | किंमत अंदाजे २,७४,२४०/-रु. |
| २. लच्मीहार | वजन अंदाजे ६९.७३० ग्रॅम | किंमत अंदाजे ५,५७,८४०/-रु. |
| ३. पेन्डल | वनज अंदाजे १७.२२० ग्रॅम | किंमत अंदाजे १,३७,७६०/-रु. |
| ४. रुद्राक्ष माळा | वनज अंदाजे ३६.७४० ग्रॅम | किंमत अंदाजे २,९३,९२०/-रु. |
| ५. चैन | वनज अंदाजे ९.६८० ग्रॅम | किंमत अंदाजे ७७,४४०/-रु. |
| ६. कंगण | वनज अंदाजे १९.८७० ग्रॅम | किंमत अंदाजे १,५८,९६०/-रु. |

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, नवीनचन्द्र रेडडी सर, मा. पोलीस उपआयुक्त श्री. गणेश शिंदे सा.(परिमंडळ- ०२), मा. पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय) कल्पना बारवकर मॅडम, मा. सहायक पोलीस आयुक्त,(गुन्हे विभाग) श्री. शिवाजी बचाटे, सहायक पोलीस आयुक्त (राजापेठ विभाग) श्री.जयदत्त भंवर सा. यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, सपोनि मनीष वाकोडे, पोउपनि प्रकाश झोपाटे, पोहवा सतीष देशमूख, पोहवा फिरोज खान, पो.हे.कॉ. सचिन बहाळे, पो.हे.कॉ. अलीमउददीन खतीब, नाईक पोलीस अमंलदार नाझीमउददीन सैयद, विकास गुढधे, सचिन भोयर, पोलीस अमलदार सुरज चव्हाण, निखील गेडामचालक- रोशन माहुरे, किशांर खेंगरे, गुन्हे शाखा युनिट क्रंमाक -०१ यांनी व पो.स्टे. सायबर येथील स.पो.नि. अनिकेत कासार, पो. हवा. निखिल माहूरे यांनी केलेली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर